महावितरण

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

C.I.N. No. U40109MH2005SGC153645

जा. क्र. औसंवि/ब/३२१९ दिनांक : १५.०२.२०१८

# परिपत्रक

**विषय :** MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy सन २०१८-१९ बाबत.

**संदर्भ :** सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. औसंवि/ब/५६५८ दि. १०.०३.२०१७.

******

म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित अंतर्गत महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपनीतील कर्मचाऱ्यांचा वेतन पुनर्निधारण करार दि. २६.६.२०१४ तील मुद्दा क्र. ०८ नुसार MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy सुरु करण्याबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार दि. ०१ जानेवारी २०१५ पासून ते दि. १४.०२.२०१८ पर्यंत तिन्ही कंपन्यांतील कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांकरिता (सदर करारातील कुटुंबाच्या व्याख्येप्रमाणे) रु. ०३ लाख मूळ राशीभूत विमा रक्कमेची मेडिक्लेम योजना सुरु होती.

सन २०१८-१९ या वर्षीच्या मेडीक्लेम योजनेच्या अटी व शर्तीमध्ये सुधारणा करण्यात येवून या योजनेमधील आजारांवरील खर्चाची मर्यादा काढण्यात यावी. तसेच, सदर योजना रु. ०३ लाखांऐवजी रु. ०५ लाखांची करण्यात यावी. याकरिता अदा करावी लागणारी अतिरिक्त रक्कम कर्मचारी वैयक्तिकपणे भरावयास तयार आहेत. त्यामुळे सदर योजनेमध्ये सुधारणा करण्यात यावी अशी विनंती तिन्ही कंपन्यांतील कर्मचारी संघटनांनी मेडिक्लेम योजनेसंदर्भातील झालेल्या दि. ३०.१.२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये व्यवस्थापनाकडे केली होती. त्यानुषंगाने, तिन्ही कंपन्यांतील कर्मचारी संघटना प्रतिनिधींनी केलेल्या विनंतीनुसार मेडीक्लेम योजनेमध्ये सुधारणा करण्यात येवून याबाबत पुनश्च: संघटना प्रतिनिधीबरोबर दि. १२.२.२०१८ रोजी सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे. सदर बैठकीत मेडीक्लेम योजना २०१८-१९ संदर्भातील पर्याय व कर्मचाऱ्यांनी वैयक्तिकपणे भरावयाची रक्कम याबाबत कर्मचारी संघटना प्रतिनिधींनी संमती दर्शविल्यानुसार मेडीक्लेम योजना २०१८-१९ चे प्रारुप अंतिम करण्यात आले आहे.

तिन्ही कंपन्यांतील कर्मचारी संघटनांच्या विनंतीनुसार तसेच MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy संदर्भात गठीत करण्यात आलेल्या समितीच्या शिफारशीनुसार दि. १५.०२.२०१८ ते दि. १४.०२.२०१९ या कालावधीकरिता तिन्ही कंपन्यांतील कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांकरिता MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy : २०१८-१९ सुरु करण्यासाठी मा.व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित यांनी मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, महापारेषण व महानिर्मिती तसेच चारही कंपन्यांचे संचालक (वित्त) व तिन्ही कंपन्यांचे कार्यकारी संचालक (मासं) यांच्यांशी विचारविनिमय करुन मंजूरी दिलेली आहे.

## MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy : २०१८-१९ ची ठळक वैशिष्ट्ये :
## (योजनेचा कालावधी दि. १५.०२.२०१८ ते दि. १४.०२.२०१९)

१. MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy **चा क्रमांक १६३६००/४८/२०१८/८८०८** असा असून या योजनेचा कालावधी दि.१४.०२.२०१८ च्या मध्यरात्रीपासून म्हणजेच दि. १५.०२.२०१८ (००:०० तासापासून) ते दि. १४.०२.२०१९ च्या मध्यरात्रीपर्यंत (२४:०० तासांपर्यंत) असा एक वर्षाचा आहे.

२. सदर योजना **म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्या. व महावितरण कंपनीमध्ये दि. १५ फेब्रुवारी २०१८ रोजी** सेवेमध्ये **कार्यरत** असणाऱ्या **सर्व कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित** असणाऱ्या **कुटुंबातील** जास्तीत जास्त **०५ सदस्यांसाठी लागू राहील.** तसेच, या कंपन्यांमधील सर्व संचालक, प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी आणि महावितरण कंपनीमधील लेखा सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) / (मासं), उपकेंद्र सहाय्यक, विद्युत सहाय्यक व वीजसेवक अशा विहीत पध्दतीने नियुक्त झालेल्या सर्वांना लागू राहील.

३. सदर योजनेतंर्गत कमाल वैद्यकीय विमा संरक्षण हे कर्मचारी व त्याच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील खाली नमूद कुटुंबाच्या व्याख्येतील वर्गवारीपैकी कर्मचाऱ्याने निर्देशीत केलेल्या कोणत्याही ०५ सदस्यांसाठी **मूळ राशीभूत विमा रक्कम रु. ०३ लाखांपर्यत राहील.** तसेच **रु. ०३ लाखांपुढील रु. ०२ लाखांकरिताचा Compulsory Increased Sum Insured (Rs. 02 Lakhs Top Up) अशा प्रकारे रु. ०५ लाखांपर्यतचे (रु. ०३+०२ लाख) वैद्यकीय विमा संरक्षण आहे.**

३.१ **<u>कुटुंबाची व्याख्या :-</u>**

- कर्मचारी / अधिकारी यांची पत्नी किंवा पती.
- कर्मचारी / अधिकारी यांवर अवलंबित असणारी औरस मुले/ सावत्र मुले / कायदेशीर दत्तक घेतलेली मुले.
  (तथापि, विमा कंपनीच्या नियमानुसार अवलंबित मुलांच्या बाबतीत खालील अटी लागू राहतील.
  - १८ वर्षापेक्षा जास्त वय असलेला मुलगा / मुलगी नोकरी करत असल्यास अथवा मुलगी विवाहीत असल्यास त्यांना अवलंबित समजण्यात येणार नाही.
  - तथापि, २६ वर्षापर्यंत वय असलेल्या मुलाचे शिक्षण सुरु असेल व तो कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबित असेल तर अशा मुलाला अवलंबित समजण्यात येईल.
  - मुलगी अविवाहीत असल्यास तिचा विवाह होईपर्यंत ती कर्मचाऱ्यांवर पूर्णपणे अवलंबित आहे असे समजण्यात येईल.
  - कर्मचाऱ्यांवर संपूर्णपणे अवलंबून असलेली मतीमंद अथवा अपंग मुले.
- कर्मचारी / अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेले कर्मचारी / अधिकारी यांचे आई-वडील, **महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्यावर पूर्णपणे अवलंबून आणि त्यांच्याबरोबर राहत असलेल्या त्यांच्या आई-वडीलांची किंवा सासु-सासऱ्यांपैकी एकाचीच निवड करता येईल.**
- कर्मचारी / अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या १८ वर्ष वयाखालील अविवाहीत भाऊ.
- कर्मचारी / अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या अविवाहीत बहिणी व घटस्फोटीत अथवा विधवा बहिणी, यांच्याबाबत त्यांचे वय लक्षात घेऊ नये.
- या नियमाखालील प्रतिपूर्ती करण्यासाठी, कर्मचारी / अधिकारी यांची अंशकालीन नोकरी व्यतिरिक्त अन्य नोकरीस असलेली मुले आणि अविवाहीत मुली लाभदायक नोकरीत असल्याचे समजण्यात येईल आणि ती त्यांच्यावर अवलंबून असल्याचे मानण्यात येणार नाही. कर्मचारी / अधिकारी यांच्यावर अवलंबून असलेल्या आईवडीलांचे दरमहा किमान उत्पन्न अथवा मुळ निवृत्ती वेतन रु.५०००/- पर्यंत आहे असे आईवडील तसेच घटस्फोटीत / विधवा बहीण हे कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहेत असे समजण्यात येईल.

३.२ **विमा योजनेसाठी कर्मचाऱ्यांनी वैयक्तिकपणे भरावयाची रक्कम :**

सन २०१८-१९ या वर्षीच्या मेडीक्लेम योजनेच्या अटी व शर्तीमध्ये सुधारणा करण्यात आलेल्या असून, सुधारीत योजनेमध्ये आजारांवरील खर्चाची मर्यादा काढण्यात आलेली आहे. तसेच, रुग्णालयामधील वैद्यकीय उपचारासाठी देण्यात येणाऱ्या कक्षाचे दर ( Room Rent) मुळ राशीभूत विमा रक्कमेच्या ०१ टक्के (Gen.) व ०२ टक्के (ICU) आहेत. या सुधारणा करण्याच्या बदल्यात कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून दरमहा रु. २३६/- (GST सह) इतकी रक्कम कपात करण्यात येईल.

**टिप :** मूळ राशीभूत विमा रक्कम रु. ०३ लाखांकरिता **कंपन्यांच्या वतीने प्रति कर्मचारी दरमहा रु.९६७/- (GST सह) इतकी रक्कम अदा केलेली आहे.** सदर रक्कम कर्मचाऱ्यांच्या या योजनेसाठी असणाऱ्या वैयक्तिक रक्कम दरमहा रु. २३६/- (GST सह) या व्यतिरिक्त आहे.

३.३ तिन्ही कंपन्यांतील सर्व कर्मचाऱ्यांकरिता रु. ०३ लाखांपुढील रु. ०२ लाखांकरिताचा **Compulsory Increased Sum Insured (Rs. 02 Lakhs Top Up)** करण्यात आलेला आहे. याकरिता कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून दरमहा रु. २६४/- (GST सह) इतकी रक्कम कपात करण्यात येणार आहे.

३.४ सन २०१८-१९ मधील मेडीक्लेम योजनेच्या अटी व शर्तीमध्ये वर नमूद केल्यानुसार सुधारणा करण्याच्या बदल्यात उपरोक्त ३.२ व ३.३ मध्ये नमदू केल्यानुसार कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून दरमहा रु. २३६/- + रु. २६४/- असे एकत्रित रु. ५००/- (GST सह) इतकी विमा रक्कम माहे मार्च -२०१८ पासून ते माहे फेब्रुवारी -२०१९ पर्यंत कपात करण्यात येईल. **(वार्षिक विमा रक्कम रु. ६०००/- (GST सह) )**

**टिप :** उपरोक्तप्रमाणे मेडीक्लेम योजनेसाठी कर्मचाऱ्यांकडून वैयक्तिकपणे अदा करण्यात येणारी विमा हप्ता रक्कम आयकर कायद्याच्या कलम -८० (ड) नुसार सवलतीसाठी पात्र राहील.

३.५ **दि. १५.०२.२०१८ ते दि. ३१.०१.२०१९ या कालावधीमध्ये कंपनीच्या सेवेतून सेवानिवृत्त / राजीनामा / सेवा समाप्ती (Termination) या कारणामुळे सेवा खंडीत होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत -** कंपनीच्या सेवेतून सेवानिवृत्त / राजीनामा / सेवा समाप्ती (Termination) या कारणांमुळे सेवा खंडीत होत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या शेवटच्या महिन्यापर्यतची दरमहाप्रमाणे पूर्वी कपात करण्यात आलेली रक्कम वार्षिक विमा रक्कमेमधून (३.४ नुसार वार्षिक विमा रक्कम) वजा करता शिल्लक असलेली उर्वरित कालावधीची रक्कम (माहे फेब्रुवारी -२०१९ पर्यंतची) एकरक्कमी संबंधीत कर्मचाऱ्याच्या शेवटच्या वेतनातून कपात करण्यात यावी.

३.६ **दि. १५.०२.२०१८ ते दि. ०१.०२.२०१९ या कालावधीमध्ये कंपनीच्या सेवेमध्ये नव्याने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत -** कर्मचारी ज्या महिन्यामध्ये कंपनीच्या सेवेत रुजू झालेला आहे त्या महिन्यापासून दरमहा प्रमाणे रु. ५००/- (GST सह) कर्मचाऱ्याच्या मासिक वेतनातून माहे फेब्रुवारी -२०१९ पर्यंत कपात करण्यात यावी.

३.७ वर नमूद केल्यानुसार कपात करण्यात आलेली विमा हप्त्याची रक्कम महावितरण कंपनीच्या मुख्य महाव्यवस्थापक (सां.ले.) यांच्या निर्देशानुसार **ERP-10902351** या खाते शिर्षकाखाली (Account Head) जमा करण्यात यावी.

४. सदर योजनेतंर्गत वैद्यकीय उपचार घेण्यासाठी रुग्णालयामध्ये रोकड रहीत (Cashless) अथवा रोकड सह (Non - Cashless) दाखल झाल्यानंतर रुग्णालयामधील उपचारासाठी देण्यात येणारा कक्ष (Room) व त्यासाठीचे दर खालीलप्रमाणे राहतील.

- **सामान्य कक्ष (General Room) : Room Rent - 1% of Sum Insured (Rs. 3000/-) or actual expenses whichever is less.**
- **अति दक्षता विभागातील कक्ष (ICU Room ) : Room Rent limited to 2% of Sum Insured (Rs. 6000/-) or actual expenses whichever is less.**

**४.१. या योजनेमध्ये आजारांवरील खर्चांची मर्यादा (Diseasewise Capping) काढण्यात आलेली आहे.** या योजनेमध्ये कर्मचाऱ्यास किंवा त्यांच्या अवलंबितास पूर्वी असलेल्या आजारांचा समावेश करण्यात आलेला आहे. (Pre-existing Diseases Covered)

४.२. या योजनेमध्ये पहिल्या ३० दिवसांपर्यंतचा आणि योजना सुरु झाल्यापासून पहिल्या ०२ ते ०४ वर्षापर्यंतचा प्रतिक्षा कालावधी शिथिल / माफ करण्यात आलेला आहे. (1st 30 days & upto 02 to 04 years waiting period waived off )

४.३. या योजनेतंर्गत रुग्णालयामध्ये दाखल होण्यापूर्वी ३० दिवसांपूर्वीचा व रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतरच्या ६० दिवसांपर्यंत केलेल्या उपचारासाठीच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देय आहे. (Pre hospitalisation upto 30 days and post hospitalisation upto 60 days Covered)

५. म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.मर्या व महावितरण या कंपन्यांमध्ये दि. १५.०२.२०१८ ते दि. १४.०२.२०१९ या कालावधीमध्ये कार्यरत असणारे कर्मचारी या योजनेसाठी पात्र असून त्यांना व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांना या योजनेचा लाभ सदर कालावधीमध्ये मिळेल.

**६. म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.मर्या व महावितरण कंपन्यांतील कर्मचाऱ्यांची सदर योजनेच्या कालावधीमध्ये सेवा समाप्ती (Termination) झाल्यास किंवा कर्मचाऱ्याचा राजीनामा स्विकारल्यास अशा कर्मचाऱ्यास व त्याच्या अवलंबितास या योजनेचा लाभ उर्वरित कालावधीसाठी घेता येणार नाही.**

सबब, ज्या - ज्या सक्षम अधिकाऱ्यांमार्फत सेवा समाप्ती किंवा राजीनामा प्रकरणी आदेश निर्गमित करण्यात येतील अशा प्रकरणांची माहिती संबंधीत परिमंडळ कार्यालयांच्या मानव संसाधन विभाग प्रमुखाने (सांघिक कार्यालयाकरिता प्रकरण परत्वे मुख्य महाव्यवस्थापक (मासं) / (तांत्रिक आस्था) / (वित्त व लेखा) यांच्या विभागांमार्फत) दरमहा तातडीने मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांना ईमेलद्वारे irdho123@gmail.com यावर पाठवावी. वर नमूद केल्यानुसार संबंधीत कर्मचाऱ्यांची माहिती (निरंक असेल तरीही) दरमहा न कळविल्यास सदर बाबत जबाबदारी निश्चित करण्यात येवून यानुषंगाने, कंपनीवर येणाऱ्या आर्थिक भाराची वसूली संबंधीत प्रकरणी जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

७. कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांना MDIndia (TPA) कंपनीच्या नेटवर्क रुग्णालयामध्ये (महावितरण कंपनीच्या Intranet वरील Employee Portal (http://empportal.mahadiscom.in/EmpPortal) अंतर्गत Mediclaim या शिर्षकाखाली List of Hospitals यामध्ये नेट वर्क रुग्णालयांची यादी पहावयास मिळेल) वैद्यकीय उपचारासाठी कॅशलेस सेवेचा लाभ मिळेल. तसेच विना नेटवर्क रुग्णालयामध्ये उपचार घेतल्यास सदर योजनेच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून वैद्यकीय उपचाराची अनुज्ञेय प्रतिपूर्ती (कॅशलेस स्वरुपात न राहता) दि ओरिएटल इन्शुरन्स कंपनी लि., या विमा कंपनीकडून मिळेल.

**<u>७.१ अवलंबित सदस्यांची व इतर माहिती अद्ययावत करणेबाबत :-</u>**

सदर योजनेसाठी दि. १५.०२.२०१८ रोजी कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना दि. १५.०२.२०१८ ते दि. १४.०२.२०१९ या कालावधीकरिता कुटुंबातील नवीन अवलंबित सदस्यांच्या नावाचा समावेश अथवा नोंदणीकृत सदस्यांपैकी एखाद्या सदस्यांची नोंदणी कायमस्वरुपी काढून टाकणे इ. करिता महावितरण Employee Portal **URL (http://empportal.mahadiscom.in/EmpPortal)** अंतर्गत Mediclaim या शिर्षकाखाली Registration या पर्यायानुसार सुधारीत करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर माहिती भरल्यानंतर व ती Submit करुन Confirm केल्यानंतर कर्मचाऱ्यांना योजनेच्या कालावधीमध्ये कुठल्याही सदस्यांचा पुन्हा नव्याने समावेश करता येणार नाही.

**मात्र,** नवविवाहीत सदस्याच्या बाबतीत (लग्न झालेल्या तारखेपासून) व नवजात बालकाच्या बाबतीत (जन्म झालेल्या दिवसापासून ३० दिवसांनतर) सदस्यांची माहिती कर्मचाऱ्यांना त्या - त्या वेळेस भरता येईल. याकरिता, कर्मचाऱ्यांनी संबंधीत सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणित केलेली सदस्यांच्या नावांची Excel sheet संपूर्ण यादीसह msebenrollment@mdindia.com यावर ईमेल करावी व सदर ईमेलची प्रत संबंधीत परिमंडळाच्या उपमुख्य औद्योगिक सबंधं अधिकारी यांना द्यावी.

**८. Additional Top Up Premium वेतनातून कपात करण्याचे संमती पत्र देणेबाबत :-**

ज्या कर्मचाऱ्यांना राशीभूत मुळ विमा रक्कम रु. ०३ लाख (Basic Sum Insured) + रु. ०२ लाख Compulsory Increasd Sum Insured रक्कमेपेक्षा जास्त रक्कमेचा म्हणजेच, रु. ०५ लाख (Rs. 03 Lakhs BSI + Rs. 02 Lakhs CISI ) पुढील रक्कमेचा अतिरिक्त विमा (Additional Top Up) घ्यावयाचा असल्यास कर्मचाऱ्यांना Additional Top Up विमा रक्कम रु. ०१ लाख ते रु. १० लाख यापैकी एका विकल्पाची निवड करावयाची आहे.

याकरिता कर्मचाऱ्यांनी महावितरण **Employee Portal URL :- (http://empportal.mahadiscom.in/EmpPortal)** अंतर्गत Mediclaim या शिर्षकाखाली Application for Top - Up या पर्यायानुसार रु. ०५ लाख (Rs. 03 Lakhs BSI + Rs. 02 Lakhs CISI ) पुढील रक्कमेचा अतिरिक्त विमा (Additional Top Up) करिता रु. ०१ लाख ते रु. १० लाख यापैकी एका विकल्पाची निवड करावयाची आहे. सदर विकल्पाची निवड केल्यानंतर Submit करुन Confirm करावयाचे आहे. कर्मचाऱ्यांनी ज्या Additional Top Up विकल्पाची निवड केली असेल त्याकरिता येणारी वार्षिक विमा हप्त्याची रक्कम GST सह एक रक्कमी कर्मचाऱ्यांच्या माहे मार्च-२०१८ च्या वेतनातून कपात करण्यात येईल, याबाबतची नोंद कर्मचाऱ्यांनी घ्यावी.

**Additional Top Up विकल्प रु. ०१ लाख ते रु. १० लाख करिता अतिरिक्त वार्षिक विमा हप्ता.**

| रु. ०३ लाख BSI + रु. ०२ लाख Compulsory Increasd Sum Insured विमा रक्कमेपुढील | संपूर्ण वर्षाकरिता विमा हप्ता (GST सह १८ %) रुपयांमध्ये | रु. ०३ लाख BSI + रु. ०२ लाख Compulsory Increasd Sum Insured विमा रक्कमेपुढील | संपूर्ण वर्षाकरिता विमा हप्ता (GST सह १८ %) रुपयांमध्ये |
|---|---|---|---|
| १ लाख | ४७७७ | ६ लाख | १०५३३ |
| २ लाख | ७३०४ | ७ लाख | १११३६ |
| ३ लाख | ८६३४ | ८ लाख | ११७८८ |
| ४ लाख | ९५२८ | ९ लाख | १२६३८ |
| ५ लाख | १००४९ | १० लाख | १३२७५ |

सदर योजना दि. १५.०२.२०१८ पासून सुरु झालेली असून वर नमूद केंल्यानुसार माहे मार्च - २०१८ च्या वेतनातून कपात केलेली Additional Top Up करिता वर्षभराची रक्कम ही विमा कंपनीस माहे एप्रिल- २०१८ मध्ये अदा करण्यात येवून **त्याचा लाभ दि. १५.०४.२०१८ पासून वर्षभराच्या कालावधीसाठी देय राहणार आहे** याची कर्मचाऱ्यांनी नोंद घ्यावी.

## ९. सामान्य आदेश क्र. २० (क) च्या तरतूदी - (फक्त कर्मचाऱ्यांबाबत)

**९.१ वैद्यकीय सुविधा -** कंपन्यांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीकरिता सर्वसाधारण आदेश क्र. २० _(क), दि. १७/०७/१९६३ मधील तरतुदीनुसार देण्यात येणारा लाभ पूर्वीप्रमाणेच चालू राहील, त्यात कुठलाही बदल करण्यात आलेला नाही. मात्र कर्मचाऱ्यांस रु. ०५ लाखांपर्यंत (Rs. 03 Lakhs BSI + Rs. 02 Lakhs CISI ) वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा लाभ सुरुवातीस MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy द्वारेच घ्यावा लागेल. कर्मचाऱ्यांकरीता स्वत:साठी रु. ०५ लाखांपेक्षा जास्त झालेल्या प्रत्यक्ष वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी सामान्य आदेश क्र. २० (क) प्रमाणे लाभ देय राहील.

**मात्र,** सदर प्रकरणी केवळ कर्मचाऱ्यांकरीता वैद्यकीय उपचारासाठी झालेल्या प्रत्यक्ष खर्चाची रक्कम ही विमा कंपनीकडून या योजनेच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यात आलेल्या रक्कमेपेक्षा जास्त असल्यास अशा प्रकरणात स. स्था. आ. क्र. ३७७, दि. ३०.८.१९५८ चे सुधारपत्र क्र. १२, दि. १२.०२.१९९८ व सा.आ. क्र २० (क) दि. १७.६.१९६३ तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र. २७२ दि. ३०.१२.२००९ मधील तरतूदीच्या अधीन राहून संबंधीत सक्षम अधिकारी प्रकरणपरत्वे निर्णय घेतील.

**९.२ वैद्यकीय अग्रीम -**

**अ)** कर्मचाऱ्यांना कामावर असताना अपघात झाल्यास अथवा तातडीच्या प्रसंगी ज्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले ते रुग्णालय कॅशलेस मेडीक्लेमसाठी MD India कंपनीच्या मान्यताप्राप्त रुग्णालयामध्ये नसेल तर परिमंडल कार्यालयांकरिता उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांनी व अन्य कार्यालयांच्या बाबतीत संबंधीत विभागातील मानव संसाधन विभाग प्रमुखांने कर्मचाऱ्याच्या सदर प्रकरणाची माहिती MD India कंपनीस दूरध्वनीद्वारे **(MSEB Mediclaim Help Line No. 1860-233-4477)** देवून २४ तासांच्या आत प्राथमिक दावा / सुचनांच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांचे नाव, भ.नि.नि. क्रमांक, रुग्णाचे नाव, रुग्णालयाचे नावं व पत्ता इ. माहितीचा ईमेल देखील msebmediclaim@mdindia.com यावर पाठवावा.

**ब)** त्यानंतर, स. स्था. आ. क्र. ३७७, दि. ३०.८.१९५८ चे सुधारपत्र क्र. १२, दि. १२.०२.१९९८ व सा.आ. क्र २० (क) दि. १७.६.१९६३ तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र. ४७७ दि. ०४.०१.२०१४ मधील तरतूदीच्या अधीन राहून संबंधीत सक्षम अधिकारी यांनी प्रकरण परत्वे कर्मचाऱ्यास वैद्यकीय उपचारासाठी अग्रीम रक्कम मंजूर करावी.

**क)** कर्मचाऱ्यास वरील प्रकरणी वैद्यकीय अग्रीम महावितरण कंपनीकडून मंजूर करण्यात आला असल्याची सुचना MD India कंपनीस ईमेलद्वारे msebmediclaim@mdindia.com द्यावी.

**ड)** अप्राणांतिक अपघाताच्या अथवा इतर तातडीच्या आजारांच्या घटनेमध्ये प्रकरणपरत्वे रुग्णालयास कर्मचाऱ्याच्या वैद्यकीय उपचारासाठी कंपनीकडून अग्रीम रक्कम दिलेली असल्यास कर्मचाऱ्यांने रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर तातडीने वैद्यकीय प्रतिपूर्ती प्रस्ताव संबंधीत कार्यालयाकडे सादर करावा. संबंधीत कार्यालयाने सदर प्रस्तावासोबत वैद्यकीय अग्रीम म्हणून रुग्णालयास अदा केलेल्या रक्कमेच्या पावतीची छायांकित प्रत व संबंधीत कार्यालयाचा बँक खाते क्रमांकासह IFSC Code ची माहिती देवून सदर प्रकरणी मंजूर होणारी रक्कम कार्यालयाच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठीचे स्वतंत्र पत्र जोडून प्रस्ताव कार्यालय प्रमुखामार्फत MD India कंपनीकडे पाठवावा. MD India कंपनीकडून या प्रकरणी मंजूर रक्कम संबंधीत कार्यालयाच्या बँक खात्यावर जमा होईल, त्यानंतरच संबंधीत कार्यालयाने अग्रीम / वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण करावा. सदर रक्कमेच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबत संबंधीत कार्यलयाच्या मानव संसाधन विभाग प्रमुखाने MDIndia कडे पाठपुरावा करावा या प्रकरणी संबंधीत परिमंडळांतील उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांचे सहकार्य घ्यावे.

**इ)** प्राणांतिक अपघाताच्या घटनेमध्ये अथवा वैद्यकीय उपचाराप्रसंगी दुर्देवाने मृत्यु झाल्यास अग्रीम रक्कम मंजूर करुन रुग्णालयास सदर रक्कमेचा धनादेश अदा केला असल्यास अशा प्रकरणी वैद्यकीय अग्रीम / वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण होईपर्यंत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितास तितक्या रक्कमेची देयके अदा करण्यात येवू नये.

**९.३ वैद्यकीय प्रतिपूर्ती -:**

- कर्मचारी / कुटुंबीयाने MD India कंपनीच्या मान्यताप्राप्त रुग्णालयामध्ये उपचार घेतले नसतील व सदर रुग्णालय कॅशलेस मेडीक्लेमसाठी नसेल तर कर्मचारी / कुटुंबातील सदस्यांने MDIndia कंपनीकडे **MSEB Mediclaim Help Line No. 1860-233-4477** यावर दुरध्वनीद्वारे अथवा ईमेलद्वारे २४ तासांच्या आत प्राथमिक दाव्याबाबत ९.२ च्या 'अ' मध्ये नमूद केल्यानुसार सुचना द्यावी. रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर तातडीने झालेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा प्रस्ताव MDIndia कंपनीकडे प्रतिपूर्ती दावा कार्यपध्दतीमध्ये नमूद केल्यानुसार (MDIndia कंपनीच्या संकेतस्थळावर नमूद केल्यानुसार) योग्य ती सर्व कागदपत्रे जोडून संबंधीत कार्यालय व समन्वय अधिकारी (Nodal Officer) यांचेमार्फत पाठविणे बंधनकारक आहे.

- सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर MDIndia कंपनीकडून या योजनेच्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने रु. ०५ लाख (Rs. 03 Lakhs BSI + Rs. 02 Lakhs CISI ) मर्यादतेपर्यंत वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कम मंजूर केली जाईल. सदर रक्कम कर्मचाऱ्याने अथवा अवलंबितांने प्रस्तावासोबत दिलेल्या IFSC Code नुसार बँकेच्या खात्यावर MDIndia कंपनीकडून परस्पर वर्ग करण्यात येईल.

- कार्यरत कर्मचाऱ्यास कामावर असताना अपघात झाल्याप्रकरणी अथवा तातडीच्या प्रसंगी कर्मचाऱ्यास वैद्यकीय अग्रीम अदा केला असल्यास ९.२ च्या 'ड' व 'इ' मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी.
- उपरोक्त प्रकरणी वैद्यकीय उपचारासाठी **फक्त कर्मचाऱ्यांसंदर्भात** प्रत्यक्षात झालेल्या एकूण खर्चाची रक्कम ही रु. ०५ लाख (Rs. 03 Lakhs BSI + Rs. 02 Lakhs CISI ) यापेक्षा जास्त असल्यास सदर प्रकरणी स. स्था. आ. क्र. ३७७, दि. ३०.८.१९५८ चे सुधारपत्र क्र. १२, दि. १२.०२.१९९८ व सा.आ. क्र २० (क) दि. १७.६.१९६३ तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र. २७२ दि. ३०.१२.२००९ मधील तरतूदीच्या अधीन राहून संबंधीत सक्षम अधिकाऱ्यांनी वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर करुन वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण करावा.

१०. कर्मचाऱ्याच्या वैद्यकीय उपचारापोटी या योजनेतंर्गत उपलब्ध असलेली विमा रक्कम रु.०५ लाख (Rs. 03 Lakhs BSI + Rs. 02 Lakhs CISI ) कंपनीच्या कार्यरत कर्मचाऱ्यासाठी खर्च झालेली असल्यास व तद्नंतर कर्मचाऱ्यांवर अवलंबित असणाऱ्या ०५ सदस्यीय कुटुंबियांपैकी कुठल्याही व्यक्तीस उपचाराची आवश्यकता असल्यास अशा प्रकरणी कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांकरिता रु.०३ लाखापर्यंतच्या वैद्यकीय विम्याचा लाभ एक विशेष बाब म्हणून उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

याकरिता, संबंधीत कार्यालयाने परिमंडळांच्या मुख्य अभियंता यांच्यामार्फत त्याबाबतचा प्रस्ताव मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, सांघिक कार्यालय, मुंबई यांचेकडे पाठवावा. सदर प्रस्तावास संचालक (वित्त) हे कार्यकारी संचालक (मासं) व मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांचेशी विचारविनिमय करुन मंजूरी देण्यासाठीचे सक्षम अधिकारी राहतील.

**११.**कर्मचारी व कुटुंबियांच्या सुविधेकरिता दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि. पुणे व **MDIndia Health Insurance Pvt. Ltd. (T.P.A.)** यांचे मार्फत सर्व परिमंडल कार्यालयात **MDIndia** कंपनीचा प्रतिनिधी समन्वय अधिकारी (Nodal Officer) म्हणून उपस्थित असतील. कर्मचाऱ्यांनी MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy संदर्भातील अडचणी सोडविण्याकरिता या समन्वय अधिकाऱ्यांची कर्मचाऱ्यांनी मदत घ्यावी.

कर्मचाऱ्यांना **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** संदर्भात स्पष्टीकरण, माहिती किंवा रुग्णालयात दाखल होण्यासाठी अथवा वैद्यकीय प्रतिपूर्तीचा दावा दाखल करण्यासाठी करावयाच्या प्रक्रियेकरिता मदतीची अथवा चौकशीची गरज असल्यास कर्मचारी अथवा त्याचे कुटुंबिय **MDIndia (T.P.A.)** कंपनीच्या **बहुभाषीक ग्राहक सेवा केंद्राशी खाली नमूद केल्यानुसार संपर्क / संवाद करु शकतात.**

- **सर्व साधारण चौकशी व कॅशलेस सुविधेच्या सवलतीसाठी हेल्पलाईन क्र. - 1860-233-4477**
- **रुग्णालयात दाखल झाल्याची सूचना देण्यासाठी ईमेल - msebmediclaim@mdindia.com**
- **या योजनेकरिता असलेल्या Enrollment संदर्भातील काही अडचणी अथवा सुधारणा असल्यास त्याकरिता ईमेल - msebenrollment@mdindia.com**

**टिप :- Enrollment - (Addition / Deletion) संदर्भातील अडचणी लक्षात घेता कर्मचारी व कुटुंबियांच्या सुविधेसाठी Enrollment करिता स्वतंत्र ईमेल (msebenrollment@mdindia.com) तयार करण्यात आलेला असून Enrollment संदर्भातील विषयासाठी ईमेल पाठविताना कर्मचाऱ्यांनी CPF No., वीजसेवकांनी Employee No. ईमेलच्या Subject मध्ये नमूद करणे बंधनकारक आहे.**

**MDIndia कंपनीसोबत पत्रव्यवहार व वैद्यकीय प्रतिपूर्तीचे दावे दाखल करण्यासाठीचा पत्ता**

**MDIndia Health Insurance (TPA) Pvt. Ltd.**
**MSEB HCL GMC Claims Department -163600/48/2018/8808,**
**पहिला मजला, कर्नावत टॉवर, पौड फाटा,**
**दशभुजा गणपती मंदिरच्या मागे, देना बँकेच्या वर,**
**पुणे- ४११०३८.**
**(MDIndia Website :www.mdindiaonline.com)**

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या **www.mahadiscom.in** या संकेतस्थळावरील **Employee Portal** अंतर्गत **Mediclaim** येथे व **RAPDRP-Infoportal-(Circular-I.R.Dept.)** येथे उपलब्ध असून त्याची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

(चंद्रशेखर येरमे)
**कार्यकारी संचालक (मासं)**
**महावितरण**

**प्रति,**
सर्व कार्यकारी अभियंता तत्सम व त्यावरील दर्जाचे अधिकारी,
महावितरण.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :**

१. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.मर्या., मुंबई.
२. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.
३. संचालक (वित्त), म.रा.वि.मं.सुत्रधारी कं.मर्या., सांघिक कार्यालय, हाँगकाँग बँक इमारत, फोर्ट, मुंबई.
४. संचालक (वित्त) / (संचलन) / (प्रकल्प) / (वाणिज्य) / महावितरण, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.

**प्रत सस्नेह :** सर्व कार्यकारी संचालक, महावितरण, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.